स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

संशोधन विषय

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा राजकीय सहभाग: एक चिकित्सक अभ्यास. (विशेष संदर्भ. स्वा. रा. ती. म. विद्यापीठ नांदेड परिक्षेत्र)

मानव्यविज्ञान विद्याशाखें अंतर्गत राज्यशास्त्र या विषयातील पीएच. डी संशोधनासाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा

संशोधक
अतुल भगवान शिंदे
रा.लिमला ता. पूर्णा जि. परभणी

मार्गदर्शक
प्रा. डॉ. प्रभाकर दिगांबरराव सूर्यवंशी
प्राध्यापक तथा राज्यशास्त्र विभागप्रमुख
स्वा .सै .सूर्यभानजी पवार महाविद्यालय पूर्णा(जं)

संशोधन केंद्र
पीपल्स कॉलेज नांदेड

2023

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा राजकीय सहभाग एक चिकित्सक अभ्यास (विशेष संदर्भ. स्वा. रा. ती. म. विद्यापीठ नांदेड परिक्षेत्र)

प्रस्तावना (Introduction)

नागरीकांचा राजकीय सहभाग हा लोकशाही शासन व्यवस्थेचा आत्मा आहे . कारण लोकांच्या राजकीय सहभागाशिवाय लोकशाहीची कल्पनाच केली जाऊ शकत नाही. ग्रीक तत्त्वज्ञ ॲरिस्टॉटल यांच्या मते, "मनुष्य हा स्वभावत: एक सामाजिक आणि राजकीय प्राणी आहे". व्यक्ती आणि राज्य यांच्यात अनन्यसाधारण असा संबंध असतो. व्यक्तीचा राजकीय सहभाग हा प्राचीन ग्रीक नगरराज्या पासून असल्याचे आढळते. परंतू तो सीमित प्रकारचा होता. आधुनिक काळात जगातील बहुतांश राष्ट्रांनी लोकशाही शासनपद्धतीचा अवलंब केलेला आहे. सिले या विचारवंतांच्या मते "लोकशाही म्हणजे शासन व्यवस्थेमध्ये प्रत्येक व्यक्तीचा सहभाग होय". जनतेचा राजकीय सहभाग प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे मतदान, निवडणुका, सरकारनिर्मिती, सरकारचा विरोध या माध्यमातून दर्शवला जातो. राजकीय सहभाग ही राजकीय समाजशास्त्रातील महत्त्वपूर्ण संकल्पना आहे. राजकीय सहभागाशिवाय राजकीय विकास, राजकीय आधुनिकीकरण शक्य नाही. येऊच या विचारवंतांच्या मते "शासनाचे निर्णय निर्धारण प्रक्रिया किंवा धोरणनिर्मिती प्रक्रिया लोकांनी स्वत:ला गुंतवून घेणे म्हणजे राजकीय सहभाग होय". लोकशाहीमध्ये जनतेचा राजकीय सहभाग हा लोकशाहीचा प्राणवायू समजला जातो. कारण लोकशाही म्हणजे जनतेचे राज्य होय. ज्यामध्ये शासनाला लोकमताची दखल घ्यावी लागते. लोकमताच्या पाठिंब्याने शासन सत्तेत येत असते. परिणामी शासनाला स्थिरता प्राप्त होते. राजकीय सहभाग मतदान, निवडणुका, सरकारला पाठिंबा देणे, निवडणुका लढवने इथपर्यंत मर्यादित नसून शासनाच्या निर्णयनिर्माण प्रक्रियेत नेत्यांनी घेतलेल्या निर्णयावर आपले मत व्यक्त करणे, त्या सर्व निर्णयावर चर्चा करणे, ते जनतेच्या कल्याणाचे असेल तर शासनाचे समर्थन करणे अथवा त्यांचा विरोध करने. तसेच आपल्या मागण्या मान्य करून घेण्यासाठी सभा, संमेलन, आंदोलन, उपोषण करणे,वर्तमानपत्र,मासिक इत्यादीतून लेख लिहून विरोध करणे अशा स्वरूपाच्या कृती म्हणजे सक्रिय राजकीय सहभाग होय. याचाच अर्थ अशा राजकीय सहभागामुळे जनता राजकीयदृष्ट्या सुशिक्षित होते. त्यामुळे लोकांचे विचार परिपक्व होतात आणि त्यातून व्यक्तीमध्ये राजकीय जाणिवांचा विकास होतो. त्यामुळे लोकांना देशासमोरील सार्वजनिक प्रश्नांचे स्वरूप कळेल व त्या आधारे कोणत्या प्रश्नांना अगोदर अग्रक्रम द्यावा, कोणते निर्णय शासनाने घ्यावे, त्यासाठी जनता शासनाला सहकार्य करते. तसेच व्यक्तीच्या राजकीय सहभागामुळे त्यांच्या मतदान वर्तनात बदल होतो. ती व्यक्ती व्यक्तिपूजेला आधार न मानता त्या सरकारचे मागील कार्य, त्या पक्षाची विचारसरणी याआधारे मतदान करते. अशा प्रकारच्या चिकित्सक राजकीय सहभागामुळे लोकशाही शासन व्यवस्थेस जीवित रुप प्राप्त होते.

कोणत्याही देशातील विद्यार्थ्यांचा राजकीय सहभाग हा भविष्याच्या दृष्टिकोनातून फार महत्त्वाचा असतो. कारण हेच महाविद्यालयीन विद्यार्थी भविष्यातील राजकारणी, सुजाण नागरिक होतात. महाविद्यालयीन विद्यार्थ्याला राजकारणाविषयी माहिती कुटुंबव्यवस्था, धर्मव्यवस्था, शाळा, प्रसारमाध्यमे यांच्या आधारे होते. परंतु विद्यार्थ्यांचा राजकीय सहभाग महाविद्यालय राजकारणातून विद्यार्थी प्रतिनिधी, विद्यार्थी नेता किंवा एक मतदार म्हणून होतो.याच काळात ते वैचारिकदृष्ट्या प्रगल्भ होत असतात. भारतीय समाजामध्ये स्वातंत्र्यापूर्वी अथवा स्वातंत्र्यानंतर जेवढे काही राजकीय आणि सामाजिक दृष्ट्या परिवर्तन झाले त्यात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची भूमिका फार महत्त्वाची होती. विद्यार्थी आपला राजकीय सहभाग विरोध प्रदर्शन, शांतीपूर्ण मोर्चे, व्यंगचित्रे ,हस्ताक्षर अभियान, जागरूकता अभियान, बैठका घेणे, प्रसारमाध्यमे, सोशल मीडिया कॅम्पेन या माध्यमातून नोंदवतात. त्याचबरोबर विद्यार्थी संघटना याव्यतिरिक्त सरकार किंवा प्रशासनाचा विरोध

करण्यासाठी डिग्री घेण्यास नकार देणे, दीक्षांत समारंभाचा विरोध करणे, त्याचबरोबर परीक्षा आणि वर्गाचा बहिष्कार करून आपला विरोध दर्शवतात. याच कारणामुळे महाविद्यालय किंवा विद्यापीठ हे लोकशाहीचे प्रांगण बनले आहे.1884 मध्ये दादाभाई नौरोजींनी स्टूडेंट लिटररी अॅन्ड सायंटिफिक सोसायटीची स्थापना केली.स्वातंत्र्यपूर्व काळात विद्यार्थी राष्ट्रीय आंदोलनाच्या माध्यमातून राजकारणात सहभागी होत असत. 1905 मध्ये स्वदेशी आंदोलन, गांधीजी ने सुरू केलेले सविनय कायदेभंग आंदोलन, असहकार आंदोलन, छोडो भारत आंदोलन या मध्ये विद्यार्थ्यांनी आपल्या सहभाग नोंदवलेला आपणास दिसून येतो. त्याचबरोबर स्वातंत्र्यकालीन क्रांतिकारी गतिविधीमध्येसुद्धा महाविद्यालयीन विद्यार्थी मोठ्या प्रमाणात सहभागी होते. भगतसिंग विद्यार्थ्यांच्या राजकीय सहभाग यावर 'विद्यार्थी आणि राजनीति' असा लेख लिहिला. भारतीय स्वातंत्र्यानंतर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी शासनाला सहकार्य, विरोध, मतदान, निवडणुका आंदोलन अथवा एक नागरी समाजाचा भाग म्हणून शासनावर टीका या माध्यमातून सक्रिय सहभाग नोंदविलेला आपणास दिसतो. तमिळनाडुमधील विद्यार्थ्यांची हिंदी विरोधी आंदोलन अथवा गुजरातमधील नवनिर्माण आंदोलन ज्याला मोरारजी देसाई ,सोशलिस्ट पार्टी ऑफ जनसंघ, भारतीय लोकदल पार्टी तसेच जयप्रकाश नारायण यांनी पाठिंबा दिला होता. परिणामी विद्यार्थी आंदोलनामुळे पंतप्रधान इंदिरा गांधी यांनासुद्धा झुकावे लागले होते. गुजरातमधील चिमणभाई पटेल यांचे सरकार असलेली विधान सभा बरखास्त करून आणीबाणी लावावी लागली आणि पुढील विधान सभा निवडणुकातून सरकारला बाहेर राहवे लागले. गुजरातच्या आंदोलनाची आग थंडी झाली नव्हती. तेच बिहारमधील अब्दुल गफूर सरकारचा भ्रष्टाचार आणि विद्यार्थ्यांच्या हॉस्टेल फीस वाढवल्यामुळे विद्यार्थी रस्त्यावर उतरले. हे भारतातील विद्यार्थी आंदोलनातील सगळ्यात मोठे आंदोलन होते. या आंदोलनाचे नेतृत्व करण्यासाठी विद्यार्थ्यांनी जयप्रकाश नारायण यांना पाचारण केले. या आंदोलनाचा परिणाम असा झाला की पंतप्रधान इंदिराजींना आणिबाणी लावावी लागली. तसेच पहिल्यांदाच भारतात गैर काँग्रेसी सरकार आले. ते विद्यार्थ्यांच्या सक्रिय राजकीय सहभागामुळेच. त्या काळात तत्कालीन महाविद्यालयीन विद्यार्थी, त्यांच्या विद्यार्थी संघटना, विद्यार्थी संघटनेची प्रमुख यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला. त्याच्यातील प्रमुख आज देशाचे नेतृत्व करताना दिसतात. यात अरुण जेटली, दिग्विजय सिंग, तारीक अन्वर लालूप्रसाद यादव, नितीशकुमार तसेच. देशाचे प्रधानमंत्री सुध्दा स्वतःला जेपी आंदोलनाशी जोडतात. त्यानंतर मंडल कमिशनविरोधी आंदोलन त्याचबरोबर यूपीएससीचा अभ्यासार्थीचे सरकार विरोधी आंदोलन ज्यामुळे सरकारला त्यांच्यासमोर झुकावेच लागले. त्याचबरोबर निर्भया हत्याकांडाविरोधात देशातील विद्यार्थ्यांनी सरकारविरोधी आंदोलन यामुळे सरकारला बलात्कारविरोधी कठोर कायदा लागला. म्हणजेच विद्यार्थ्यांचा राजकीय सहभाग शासनावर नियंत्रण ठेवण्यासाठी, लोकशाहीला जिवंत ठेवण्यासाठी महत्त्वाचा आहे.

समस्यासूत्रण (Problem formulation) :-

जगातील सगळ्याच लोकशाही देशामध्ये विद्यार्थी महत्त्वपूर्ण भूमिका बजावताना दिसत आहे. आजचे महाविद्यालयीन विद्यार्थी भविष्यातील देशाचे राज्यकर्ते, सुजाण नागरिक होणार आहेत. जसे आणीबाणीच्या काळात विद्यार्थी संघटनांनी विद्यार्थ्यांनी सरकारच्या अति शासनाचा विरोध केला. लालू प्रसाद यादव, सीताराम येचुरी, मुलायम सिंह यादव, अरुण जेटली यासारखे तत्कालीन विद्यार्थी. आज देशाचे नेतृत्व करताना दिसत आहेत. आजच्या तरुण पिढीतील जेएनयूमधील विद्यार्थी प्रतिनिधी कन्हैयाकुमार सारखे अनेक विद्यार्थी महाविद्यालयीन राजकारणामुळे देशाच्या राजकारणात सक्रिय सहभाग घेताना दिसत आहे. परतू असे असले तरी भारतातील काही मोजकी विद्यापीठे किंवा महाविद्यालय सोडली तर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा राजकीय सहभाग संकुचित अशा प्रकारचा दिसतो. राजकारणात. विद्यार्थ्यांना बदलाचे प्रतीक म्हणून पाहिले जाते. म्हणून विद्यार्थ्यांचा राजकीय सहभाग हा गरजेचा आहे. पण जेव्हा विद्यार्थ्यांच्या राजकीय सहभागाचा विचार केला जातो, तेव्हा विद्यार्थ्यांना राजकारणात येण्यासाठी प्रवृत्त करणारे घटक कोणते असतील? विद्यार्थ्यांचा राजकीय सहभाग कोणत्या प्रकारचा आहे? विद्यार्थी संघटना आणि विद्यार्थी आंदोलन याचा परिणाम विद्यार्थ्यांवर काय

होतो? देशातील विविध राजकीय समस्या समजावून घेण्यापर्यंत त्यांची राजकीय जाणीव वाढली आहे का? एक मतदार म्हणून तो आपला हक्क कशा प्रकारे बजावत आहे? महाविद्यालयीन विद्यार्थी सत्ता बदलासाठी एक निर्णायक घटक बनला आहे का? महाविद्यालयीन विद्यार्थी जात धर्म, पंथ, भ्रष्टाचार या लोकशाहीसमोरील आव्हानांना तोडू शकतो का? महाविद्यालयीन राजकारणामुळे देशातील राजकारणात विद्यार्थ्यांचा वाटा वाढला आहे का? विद्यार्थ्यांच्या राजकीय सहभागामुळे त्यांच्यात लोकशाही मूल्यांची रुजवण झाली आहे का? महाविद्यालयीन राजकारणामुळे विद्यार्थी हा एक दबाव गटाची भूमिका पार पाडू शकतो का? अशा स्वरूपाच्या अनेक प्रश्नांचा शोध घेण्याची आवश्यकता वाटते. त्या पार्श्वभूमीवर सदरील संशोधन महत्त्वपूर्ण वाटते.

संशोधन विषयाचे महत्त्व (Importance of research topic) :-

भारतीय समाजातील सगळ्यात ऊर्जावान, सुशिक्षित, वैचारिक पातळी निर्माण होत असलेला गट म्हणून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकडे पाहिले जाते. आज घडीला भारतात जवळपास चार कोटी विद्यार्थी उच्च शिक्षण घेतात. त्यांना राजकीय शिक्षण मिळते ते महाविद्यालयीन आणि विद्यापीठाच्या प्रांगणात. देशातील प्रत्येक पक्ष युवा वर्गाला आपल्या पक्षाशी जोडण्यासाठी युवा संघटना, विद्यार्थी संघटना काढत आहे. आजच्या तरुण राजकारणाच्या झुंडीमध्ये अडकला आहे. प्रत्येक पक्ष त्यांचा वापर करून घेताना दिसत आहे. राजकीय पक्षांची आंदोलन त्यांच्या निवडणुकांचा प्रचार व्यक्ती पूजा, पक्षांची विचारसरणी, धोरणे विचारात न घेता त्यांच्या सभांना गर्दी यात अडकला आहे. जाती, धर्माच्या पक्ष राजकारणाचा विद्यार्थ्यांवर परिणाम पडतो आहे. परिणामी विद्यार्थ्यांचे प्रश्न न सुटता गोंधळ व गुंडप्रवृत्तीला वाव मिळतो आहे. ज्या सत्ताधारी पक्षाचा तो कार्यकर्ता आहे त्याला प्रश्न न विचारता अंधभक्ता प्रमाणे त्यांचा पाठपुरावा करताना दिसतो आहे.

कोणताही राजकीय पक्ष निवडून येईपर्यंत महाविद्यालयीन विद्यार्थ्याला हाताशी घेऊन निवडणुका जिंकून घेतो. पण सत्तेत आल्यावर मात्र विद्यार्थी आणि त्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष केले जाते. डिग्री करून बाहेर पडलेले अनेक विद्यार्थी बेरोजगार दिसतात. भारतात एकूण जीडीपीच्या 2.7% एवढा खर्च शिक्षणावर होतो. जगाचा विचार केला तर त्यात भारताचा 143 वा क्रमांक लागतो. आपल्या प्रश्नासंबंधी मागण्यांसंबंधी किंवा देशाचा एक जबाबदार नागरिक म्हणून सरकारविरोधी आंदोलन केले. तर ती पोलिसांच्या मदतीने दडपली जातात. राजकीय सत्ता, राजकीय पक्षाची महत्त्वाची पदे, अन्य स्थानिक सत्ता, शिक्षण मतदारसंघ सिनेट सदस्यही चाळीशी ओलांडलेल्या व्यक्तीकडे आहेत. राजकीय पक्ष, विद्यार्थी संघटना इत्यादी सर्वांकडून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची निराशा होत आहे. परिणामी विद्यार्थ्यांन मध्ये राजकीय उदासीनता निर्माण होत आहे. त्यामुळे या वर्गाला राजकारणात चिकित्सक, सक्रिय आणि परिपक्व अशा राजकीय सहभाग घेण्याची आवश्यकता आहे.

भारतीय लोकशाहीच्या बाबतीत विचार केल्यास सर्वसामान्य जनतेचा राजकीय सहभाग, प्रतिकात्मक, प्रासंगिक आणि निर्मित अशा स्वरूपाचा असल्याचे दिसते. जमातवाद, जातिवाद, वंशवाद, भाषाकवाद, विविध प्रलोभने. दबाव आणि भावनिक आव्हान यामुळे राजकारण प्रभावित होत असते. परिणामी राजकीय सत्ता अपात्र व्यक्तीकडे जाऊन सत्ता आणि संपत्तीचे मोठ्या प्रमाणात. केंद्रीकरण होत आहे. लोकशाही शासन व्यवस्थेत अनेक अपप्रवृत्ती मोठ्या प्रमाणात बळावलेली आहेत. त्यांना वेळीच आवर नाही घातला तर लोकशाहीचे रूपांतर झुंडशाहीत होण्यास फार वेळ लागणार नाही. लोकशाही शासन व्यवस्थेत सत्ता ही भांडवलशाही आणि घराणेशाही यात अडकून बसली आहे. तसेच गुंडगिरी प्रवृत्ती माजली आहे. परिणामी लोकशाहीचा भारतातील दर्जा घसरत आहे. जगाचा विचार करता भारतीय लोकशाही धोक्याच्या वळणावर आहे. लोकशाहीला भक्कम आणि परिपक्व बनवण्यासाठी व्यक्तीचा राजकीय सहभाग हा सक्रिय आणि जागृत अशा प्रकारचा असावा. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा राजकीय सहभाग लोकशाहीच्या दृष्टीने फार महत्त्वाचा आहे. कारण महाविद्यालयीन काळामध्ये त्यांच्यात वैचारिक प्रगल्भता निर्माण होत असते. तो भविष्यात एक

शासनकर्ता ,जबाबदार नागरिक, प्रबळ नागरी समाज, दबाव गट यांची भूमिका बजावू शकतो म्हणून सदरील संशोधन हे भारतीय लोकशाहीचे भवितव्य आणि शासनावरील नियंत्रण इ. दृष्टीने महत्त्वाचे आहे.

संशोधनाची उद्दिष्टे (Research Objectives)

संशोधन कोणत्याही प्रकारचे असले तरी त्या संशोधनाची निश्चित असे उद्दिष्ट असतात. एखादे संशोधन समाजातील समस्या सोडवण्यासाठी केले जाते. तर एखादे संशोधन ज्ञान प्राप्त करण्यासाठी केले जाते. प्रस्तुत संशोधन कार्याचा मुख्य उद्देश. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा राजकीय सहभाग वाढला आहे का? त्यांच्या राजकीय जाणिवा विकसित झाल्या आहेत का? लोकशाहीवरील विद्यार्थी राजकारणाचा परिणाम इत्यादिविषयी माहिती घेण्यासाठी प्रस्तुत विषय निवडण्यात आला आहे. या संशोधनाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

1. विद्यार्थ्यांच्या राजकीय सहभागाचा अभ्यास करणे.
2. विद्यार्थ्यांच्या राजकीय सहभागाला प्रभावित करणाऱ्या घटकांचा शोध घेणे.
3. विद्यार्थी संघटना, विद्यार्थी आंदोलन हे विद्यार्थ्यांच्या राजकीय सहभागाला प्रभावित करतात का? याचा अभ्यास करणे.
4. महाविद्यालयीन विद्यार्थी सत्ता परिवर्तनासाठी एक निर्णायक घटक बनला आहे का? याचा अभ्यास करणे.
5. विद्यार्थी सहभागामुळे लोकशाही बळकट झाली आहे का? याचा शोध घेणे.
6. विद्यार्थ्यांमध्ये राजकीय जाणीव जागृती झाली आहे का? याचा अभ्यास करणे.
7. विद्यार्थ्यांच्या राजकीय सहभागामुळे मतदानातील टक्का वाढला आहे का? याचा शोध घेणे.

गृहीतके (Hypothesis)

संशोधन कार्य करत असताना गृहीतकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. गृहीतक हे एक असे विधान मानले जाते की जे संशोधन कार्य सुरू करण्यापूर्वी मानले जाते. शेवटी संशोधनातून प्राप्त झालेल्या निष्कर्षांशी जोडून पाहिले जाते. त्यावरून संशोधकांचे यश अपयश देखील मोजले जाते. प्रस्तुत संशोधन कार्य करण्यासाठी खालील गृहीतकाचा आधार घेतला जाणार आहे.

1. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा राजकारणा सहभाग वाढला आहे.
2. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमधील राजकीय जाणिवा विकसित होत आहेत.
3. महाविद्यालयीन विद्यार्थी सत्ता परिवर्तनासाठी एक निर्णायक घटक ठरत आहे.
4. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या राजकीय सहभागामुळे लोकशाही बळकट होत आहे.
5. विद्यार्थी राजकारणात उत्स्फूर्तपणे सहभागी झाले आहेत.

संशोधन पद्धती (Research Methadology) :-

सदरील संशोधन कार्य वस्तुनिष्ठ आणि निष्पक्षपाती पणे व्हावे यासाठी सर्वेक्षण पध्दतीचा अवलंब केला जाईल. त्यातील नमुना सर्वेक्षण पध्दती म्हणजे लोकसंख्येचे योग्य प्रतिनिधित्व करु शकेल अशा नमुन्यातील निवड करून त्या नमुन्यातील एककाचे अध्ययन करून निष्कर्ष मांडले जातात. ते निष्कर्ष संपूर्ण समग्रासाठी लागू केले जातात. या बरोबर आवश्यकतेनुसार मुलाखत आणि निरिक्षण पध्दतीचा अवलंब केला जाईल.

तथ्य संकलन (Data Collection) :-

या संशोधनकार्यात तथ्य संकलन (Data collection) करण्यासाठी प्राथमिक स्त्रोत (Primary Source) आणि द्वितीयक स्त्रोत (Secondary Source) या दोन्ही स्रोतांचा आधार घेतला जाणार आहे.

प्राथमिक स्त्रोत (Primary Source):-

प्रस्तुत संशोधन कार्यामध्ये प्राथमिक स्त्रोत अंतर्गत मुलाखती, प्रश्नावली, अनुसूची, निरीक्षण या प्राथमिक स्रोतांचा उपयोग आवश्यकतेनुसार केला जाईल.प्रत्यक्ष महाविद्यालयात जाऊन विद्यार्थी,विद्यार्थी प्रतिनिधी,विद्यार्थी संघटनाचे प्रमुख, विद्यार्थी नेते यांच्या मुलाखती, प्रश्नावली,अनुसूची द्वारे तथ्य संकलन केले जाईल. संशोधनास पूरक माहितीसाठी निरीक्षण पद्धतीचा अवलंब केला जाईल. त्याचबरोबर निवडणुकीच्या काळात सुद्धा विद्यार्थ्यांशी, विद्यार्थी नेत्याशी, चर्चा करून संशोधनासंदर्भात माहिती मिळवली जाईल.

द्वितीयक स्त्रोत (Secondary Source) :-

राजकीय सहभागातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे प्रमाण शोधण्यासाठी प्राथमिक स्त्रोता बरोबर द्वितीय स्त्रोतांचा उपयोग केला जाईल. या अंतर्गत जनगणना अहवाल,केंद्र निवडनूक आयोग व राज्य निवडणूक आयोगाचे अहवाल यांचा उपयोग केला जाईल.त्याचबरोबर महाविद्यालय व विद्यापीठतील विद्यार्थी प्रतिनिधी,सिनेट सदस्य यांच्या निवडणुकीच्या संदर्भातील अहवाल यांच्या आधारे तथ्याचे संकलन केले जाईल. त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या राजकीय प्रवाहावर प्रकाश टाकणारे ग्रंथ, मासिके, साप्ताहिके, लेख इत्यादीचा आधार घेतला जाईल. विद्यार्थी आंदोलन व विद्यार्थी संघटना यांच्या संदर्भातील ग्रंथ त्याचबरोबर महाराष्ट्रातील राजकीय घटना घडामोडी या संदर्भातील वेगवेगळे लेख आणि या सोबतच विषयाला अनुसरून असलेल्या वेगवेगळ्या संकेतस्थळावरील माहिती यांचा उपयोग केला जाईल.

नमूना निवड पध्दती (Sample selection method) :-

सदरील संशोधन कार्यास विद्यार्थ्यांच्या राजकीय सहभागाच्या अध्ययनावर भर देण्यात येणार असल्यामुळे सहेतुक नमुना निवड पद्धतीने स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड परिक्षेत्रांतर्गत येणाऱ्या नांदेड परभणी लातूर आणि हिंगोली जिल्ह्यातील व्यवसायिक व अव्यवसायिक अभ्यासक्रमातील पदवी व पदवी उत्तर मधील काही पदवी व पदवी उत्तर महाविद्यालयाची निवड करण्यात येणार आहे व त्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या राजकीय सहभागाच्या उद्देशाने सहेतुक पद्धतीने नमुने घेतले जातील.

संशोधनाची व्याप्ती (Scope of Research)

सदरील संशोधन कार्यात केवळ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या राजकीय सहभागाच्या अध्ययनावर भर देण्यात येणार आहे. क्षेत्रीय कार्यासाठी म्हणून स्वा.रा.ती.म.विद्यापीठ परिक्षेत्र निवड करण्यात येणार आहे. त्याचबरोबर राजकारणातील सहभागी असणाऱ्या विविध वर्गांपैकी केवळ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना त्यांचा राजकारणातील सहभाग, त्याला प्रभावित करणारे घटक. इत्यादि घटकाविषयी विश्लेषण प्रस्तुत संशोधन कार्यात करण्यात येणार आहे.

संशोधन मर्यादा (Research Limitations) :-

भोगोलिक दृष्ट्या महाराष्ट्रातील मराठवाड्यातील स्वा.रा.ती.म.विद्यापिठ परिक्षेत्रा पुरते संशोधन कार्य मर्यादित आहे. केवळ महाविद्यालयीन विद्यार्थी यांच्यापुरते संशोधन कार्य मर्यादित आहे. त्याचबरोबर संशोधन कालावधीतील अभ्यासावर संबंधित संशोधन कार्य करण्यात येणार आहे. प्रस्तुत संशोधन कार्यात केंद्रीय पातळीवरील सत्ता लोकसभा, राज्यसभा राज्य पातळीवरील सत्ता विधानसभा, विधानपरिषद, स्थानिक पातळीवर सत्ता स्थानिक स्वराज्य संस्था या सत्ताकेंद्रांचा प्रामुख्याने अभ्यास करून विश्लेषण केले जाणार आहे.

संशोधन अहवाल (Research Report)

प्रकरण रचना

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा राजकीय सहभाग एक चिकित्सक अभ्यास विशेष संदर्भ स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड परिक्षेत्र. या संशोधन कार्याची पाच प्रकरणांमध्ये विभागणी करण्यात येणार आहे. या संशोधन कार्याची प्रकरण निहाय मांडणी खालील प्रमाणे करण्यात आली आहे.

प्रकरण पहिले : प्रस्तावना

या प्रकरणात संशोधन विषयाच्या समस्यासुत्रना विषयी माहिती देण्यात येणार आहे. विषय निवडीचे महत्त्व स्पष्ट केले जाईल. संशोधन पुर्व आढावा घेतला जाईल त्याचबरोबर संशोधन पद्धतीची सविस्तर मांडणी करण्यात येईल. या विषयाच्या अनुषंगाने झालेल्या अभ्यासाचा आढावा घेऊन विषयाची पार्श्वभूमी या प्रकरणात मांडण्यात येणार आहे .

प्रकरण दुसरें : राजकीय सहभाग आणि लोकशाही

या प्रकरणामध्ये राजकीय सहभाग आणि लोकशाही या संकल्पनांची सैद्धांतिक मांडणी केली जाईल. यात राजकीय सहभाग म्हणजे काय? राजकीय सहभागाचे प्रकार, स्वरूप यांची चर्चा केली जाईल. लोकशाही म्हणजे काय? लोकशाहीचा अर्थ, व्याख्या त्याचे प्रकार यावर चर्चा केली जाईल. त्याचबरोबर लोकशाही शासनातील राजकीय सहभाग कशा स्वरूपाचा असेल. लोकशाही मधील राजकीय सहभागाची गरज त्याचे महत्त्व इत्यादी घटकांचा या प्रकरणामध्ये अभ्यास केला जाईल.

प्रकरण तिसरें : राजकीय सहभाग आणि महाविद्यालयीन विद्यार्थी

राजकीय सहभागाची सैद्धांतिक मांडणी करून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा राजकीय सहभागाचा ऐतिहासिक आढावा घेतला जाईल. सध्याची स्थिती काय आहे याचा अभ्यास केला जाईल. त्याचबरोबर

राजकीय सहभागाचा अभ्यास विद्यार्थ्यांची राजकीय सुशिक्षिता,राजकीय जाणीवा,दबाव गट, विद्यार्थी संघटना,विद्यार्थी आंदोलन यातून केला जाईल. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा सत्तेतील वाटा यावर चर्चा केली जाईल. त्याचबरोबर सरकार, निवडणूका, निर्णयप्रक्रिया यावर विद्यार्थ्याच्या राजकीय सहभागाचा प्रभाव याचा अभ्यास केला जाईल. याची मांडणी या प्रकरणात करण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे : स्वा.रा.ती.म. विद्यापीठ परिक्षेत्रातील विद्यार्थ्यांचा राजकीय सहभाग

यावप्रकरणात आपण स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड परिक्षेत्रातील महाविद्यालीन विद्यार्थ्याचा राजकीय सहभाग कशा स्वरुपाचा आहे याचा अभ्यास केला जाईल. त्याच बरोबर प्राथमिक आणि द्वितीयक साधनसामग्रीच्या आधारे विद्यार्थ्याच्या राजकीय सहभागाचा शोध घेतला जाईल. प्रत्यक्ष क्षेत्रीय कार्यातून संकलीत केलेल्या प्राथमिक स्वरूपाच्या माहितीच्या आधारे महाविद्यालयीन विद्यार्थ्याच्या राजकीय सहभागाचे विविध पैलू स्पष्ट केले जातील. त्याच्यातील राजकीय जागृतीचा शोध घेऊन महाविद्यालयीन विद्यार्थ्याच्या राजकीय सहभागाला प्रभावित करणाऱ्या घटकांचा शोध घेतला जाईल व त्याची निष्कर्षात्मक मांडणी केली जाईल.

प्रकरण पाचवे : निष्कर्ष आणि शिफारशी

याप्रकरणात प्रस्तुत संशोधन कार्याची गृहीतके आणि उद्दिष्ट यांना अनुसरून निष्कर्षाची मांडणी केली जाईल. निष्कर्षाची मांडणी केल्या नंतर संशोधन उदिष्टाची पुर्तता होण्याच्या दृष्टीकोनातून महत्वपूर्ण शिफारशी सुचवण्यात येतील.

संदर्भग्रंथ (bibliography) :-

१) कुवरलालही वासनिक आणि. शीतल .लो.रोकडे, राजकीय समाजशास्त्र, ज्ञानपत प्रकाशन, प्रयाग. 2020,
२) ची.ग.घांग्रेकर.आणि सौ.श्रुती उदय मेहता. राजकीय समाजशास्त्र, दत्तसण पब्लिकेशन, नागपुर, 2000,
३) प्रमोद पवार आणि गौतम भालेराव, विद्यार्थी संघटना आणि राजकारण. अथर्व पब्लिकेशन, 2015,
४) प्रशांत दिघे आणि धर्मेंद्र तेलगोटे, लोकशाही निवडून प्रक्रिया आणि सुशासन श्री साईनाथ प्रकाशन नागपूर, 2019,
५) राजशेखर सोलापुरे, लोकशाही आणि निवडणूक प्रक्रिया, अरुणा प्रकाशन, लातूर 2017
६) संपादक,राजेंद्र होरा आणि सुहास पळशीकर, अनुवाद चित्रा लेले, भारतीय लोकशाही आणि अर्थ आणि व्यवहार, डायमंड पब्लिकेशन. 2008,
७) संजयकुमार, भारतीय युवा आणि निवडणुकीय सहभाग, सेज पब्लिकेशन, 2012.
८) गिरीराजशरण अग्रवाल, मीना अग्रवाल, उच्च कक्षाओ के छात्र के लिहिले, डायमंड प्रकाशन, नई दिल्ली, 2005
९) पियुष शर्मा, युवा Can Lead, नेशन प्रेस, 2020

१०) बी. एल.फाडीया और पोखराज जैन, राजकीय समाजशास्त्र, साहित्य भवन, पब्लिकेशन, 2012
११) बजरंग सिंह, ऑख देखी बिहार आंदोलन, प्रभात प्रकाशन, नईदिल्ली,2018
१२) राहूल कुमार, काले दिन के कारे कागद, बीएससी प्रकाशन, लखनऊ, 2022
१३) राजकुमार भाटिया, राष्ट्र समाज एक छात्र, प्रभात प्रकाशन, नई दिल्ली, 2022
१४) शामकृष्ण पांडे आणि रचना सिंग, भारतीय छात्र आंदोलन का इतिहास, हिंदी साहित्य संमेलन, प्रयाग , 2008,
१५) Achuthshakar.S.Nair, Campus Politics: Don't be Silent, Don't be Violent. N.p., Infinity Indica Publishers, 2022.
१६) Atul Kolhi, The State of India's Democracy. Italy, Johns Hopkins University Press, 2007
१७) Chakraborty, Roma. Political Socialization of Students in Metropolitan Calcutta. India, Daya Publishing House
१८) Jeffrey, Craig. Timepass: Youth, Class, and the Politics of Waiting in India. United States, Stanford University Press, 2010.
१९) Rajimwale, Anil. History of Student Movement in India: Origins and Development (1920-1947). India, Manak Publications, 2001.
२०) Rethinking Indian Political Institutions. United Kingdom, Anthem Press, 2005.
२१) Subas Chandra hazare, Students Politics in India: Understanding the experiences in North East India. India, Bidya Bhawan, 2013.
२२) Upreti, Harish Chandra. Youth Politics in India. India, Printwell Publishers, 1

नियतकालिके :-

1) परिवर्तनाचा वाटसरू, प्रज्ञा दया पवार नारायण भोसले माधुरी दीक्षित सुरेंद्र जोंधळे , ISSN: 2250-3145, पुणे
2) कुरुक्षेत्र ,सूचना एवं प्रसारण मंत्रालय, भारत सरकार, आई.एस.एस. एन. 0971-8451, लोधी रोड नई दिल्ली-110003
3) योजना ,सूचना एवं प्रसारण मंत्रालय, भारत सरकार, , ISSN-0971-8397, लोधी रोड नई दिल्ली-110003
4) Economic and Political Weekly Paranjoy Guha Thakurta, Sameeksha Trust (India), ISSN, 0012-9976

अहवाल:-

केंद्रीय निवडणूक आयोग https://eci.gov.in/

राज्य निवडणूक आयोग https://mahasec.maharashtra.gov.in/

संकेतस्थळे:-

https://pib.gov.in/PressReleasePage.aspx?PRID=1687976

https://oldgrt.lbp.world/UploadedData/6521.pdf

https://mr.vikaspedia.in/social-welfare/93893e92e93e91c93f915-93890291593294d92a92893e-935-93890291c94d91e93e/92f941935915-91a933935933940

https://www.aksharnama.com/client/article_detail/3316

https://swarajmanepatil.blogspot.com/2013/06/blog-post_18.html?m=1

https://www.google.com/amp/s/www.orfonline.org/marathi/pushing-gender-inclusive-politics/

https://youtu.be/0q4NcwbKmtI

संशोधक
अतुल भगवान शिंदे
ता. पूर्णा., जि. परभणी

मार्गदर्शक
प्रा. डॉ. प्रभाकर दिगांबरराव सूर्यवंशी रा लिमला
राज्यशास्त्र विभागप्रमुख
स्वा. सै. सुर्यभानजी पवार महाविद्यालय पुर्णा (जं)